


Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

लोकमत

# अवयवदान दिनानिमित्त वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा (जि. नंदुरबार) राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत अवयव दान दिनानिमित्त महाविद्यालय आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या निमित्ताने विविध उपक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले.

अवयव दानाचे व वृक्षाचे महत्त्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. व स्वहस्ते वृक्षारोपणाला सुरवात केली तसेच विद्यार्थी विकास अधिकारी- डॉ.अरुण पाटील, प्रा. डी. डी. पाटील, प्रा. आर. एस. पाटील, प्रा. डॉ. आर. जी. काकुस्ते, माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. जी. वसावे, प्रा. मुकुंद भदाणे, प्रा. जगदाळे, मुख्याध्यापक पी. पी. पिंपळे, गोरख पाटील, चव्हाण, गावित, कुवर व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी वृक्षारोपण करून सहभाग नोंदविला.

अवयव दानाचे महत्व यावेळी वक्त्यांनी पटवून दिले. यासाठी जनजागृती महत्वाची असून त्यासाठी उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एल.सावंत व महिला सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.एस.पवार यांनी आभार व्यक्त केला.

Scanned with CamScanner

लोकमत

# जिल्हाभरात रासेयो स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार** : जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन स्थापनेनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.

**डी.आर. कनिष्ठ महाविद्यालय, नंदुरबार**

नंदुरबार : राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त दुर्गाबाई रघुवंशी कनिष्ठ महाविद्यालयात नंदुरबार पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी एस.एन. पाटील यांचे सेवाकार्य या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी व्याख्यानात मानवी मन व मानवी सेवा या विषयावर आधारित अनेक दाखले दिले. स्वयंसेवक याविषयांची समाजाशी कशी सांगड जुळली पाहिजे याबद्दल उदाहरणे दिलीत. कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य एस.व्ही. चौधरी, एन.एस.एस नंदुरबार जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.उमेश शिंदे, प्रा. निशिकांत शिंपी, प्रा.मनीषा अग्निहोत्री, प्रा. नितीन कबाडे उपस्थित होते. प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा. तुषार पाटील, परिचय प्रा.डॉ. उमेश शिंदे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विक्रम परदेशी यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षकेतर कर्मचारी संजय फुलंब्रीकर व चतुर ठाकूर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास रासेयो स्वयंसेवक मूले-मूली उपस्थित होते. या वेळी कोविड नियमानुसार सुरक्षित अंतर ठेवून कार्यक्रम घेण्यात आला.

**आर.एफ.एन.एस. महाविद्यालय, अक्कलकुवा**

क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आर.एफ.एन.एस. वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय अक्कलकुवा यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय सेवा योजना दिवसानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी ग्राम वाचन कट्टा देवमोगरा (पुनर्वसन) तेथे स्थापना करण्यात आला. या वेळी जिल्हा समन्वयक डॉ.विजय पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.पी .सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.विनोद राघोजी जोगदंड व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.राजेश्वरसिंग पाडवी यांनी विद्यापीठाच्या सूचनेचे पालन करून कवित्री बहिणाबाई चौधरी ग्राम वाचन कट्टा स्थापन केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देवामोगरा (पुनर्वसन) सरपंच कल्पनाबाई पाडवी, उपसरपंच द्वारकासिंग वसावे तसेच जिल्हा परिषद मुख्याध्यापक दिनेश पाडवी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सिमाजी पाडवी, केवलसिंग पाडवी, ग्रामपंचायत सदस्य सुनिता पाडवी, जिल्हा समन्वयक डॉ.विजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाकडून १०० पुस्तके देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.भरत पाटील तर आभार डॉ.विनोद जोगदंड यांनी मानले.

## जामली येथे वाचन कट्टा स्थापन

■ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आदेशान्वये राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त अक्कलकुवा येथील विद्या विकास मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जामली ता.अक्कलकुवा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी वाचन कट्टा स्थापन करण्यात आला. या प्रसंगी सरपंच, जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला. युवा पीढी मध्ये वाचन संस्कृती जोपासण्यासाठी उपयुक्त असलेली १०१ पुस्तके व मासिके भेट देण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.महेश गांगुर्डे व विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.अरुण पाटील डॉ.राजेंद्र काकुस्ते, प्रा.डी.डी. पाटील प्रा.आर.सी. पाटील, माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी. वसावे इत्यादींनी रासेयोची वाचन कट्टा या आगळ्यावेगळ्या संकल्पनाची प्रशंसा करून स्वागत केले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एल. सावंत यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.एस. पवार केले.



जामली, ता.अक्कलकुवा येथे कला, वाणिज्य महाविद्यालयातर्फे वाचन कट्टा स्थापन करण्यात आला. या वेळी महाविद्यालयातर्फे १०१ पुस्तके भेट देताना डॉ.महेश गांगुर्डे, डॉ.अरुण पाटील, डॉ.राजेंद्र काकुस्ते, प्रा.डी.डी.पाटील, प्रा.आर.सी. पाटील, प्रा.एम.जी. वसावे.

Hello Nandurbar
Page No. 4 Sep 26, 2021
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# जिल्ह्यातील महाविद्यालयात लसीकरण मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



अक्कलकुवा महाविद्यालयात लसीकरण मोहिमेचा शुभारंभप्रसंगी प्राचार्य एस.बी. पाटील, डॉ.वैशाली परदेशी, प्रा.दिनेश खरात, जी.वाय. पाटील, प्रा.अरुण पाटील, प्रा.एम.एस. पाटील आदी.

**कला, विज्ञान महाविद्यालय, शहादा**

शहादा शहरातील कला व विज्ञान महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे 'युवा स्वास्थ्य मिशन' अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी व पालकांसाठी २५ ते ३० ऑक्टोबर दरम्यान लसीकरण शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचे उद्‌घाटन सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. संजय जाधव व सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव वर्षा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. भारत चाळसे, आरोग्य अधिकारी डॉ. मनीलाल शेल्टे, वैद्यकीय अधिकारी डॉ. हार्दिक पटेल, आरोग्य सेवक व परिचारक गोरख कांबळे, परिचारिका अमिता नेतकर, पूजा धुळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी एच. आर. कुलकर्णी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी एस. यू. अहिरराव, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. बी. अहिरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अनिल साळुंके, ग्रंथपाल प्रा. डॉ. प्रसन्ना डांगे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एच. आर. कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी एच. आर. कुलकर्णी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी एस. यू. अहिरराव, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. बी. अहिरे, प्रा. बी. आर. राजपूत, गोकुळ महाजन, शोभा गुरव प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा**

अक्कलकुवा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग आणि प्राथमिक अरोग्य केंद्र ब्रिटिशअंकुशविहीर यांच्या सयुक्त विद्यमाने युवा मिशन स्वास्थ्य लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली. मिशन युवा स्वास्थ्य अभियान अंतर्गत महाविद्यालयात मोहिमेच्या शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील होते. त्यांनी मोहिमेस सहकार्य करून सहभाग घ्यावा तसेच आपल्या मित्र परिवाराला लसीकरणासाठी प्रवृत्त करावे, ही अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली परदेशी यांनी विद्यार्थ्यांना लस घेण्यासाठी आवाहन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य जी.वाय. पाटील व डॉ.दिनेश खरात, डॉ.महेश गांगुर्डे, डॉ.ए.व्ही. बाविस्कर, डॉ.जे.बी. बागुल, डॉ.आर.सी. बेडसे, प्रा.आर.एस. पाटील विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.अरुण पाटील, डॉ.राजेंद्र काकुस्ते, प्रा.डी.डी. पाटील, प्रा.आर.सी. पाटील, प्रा.एम.जी. वसावे, प्रा.पी.एन. नाईक, मुख्याध्यापक पिंपळे आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. अरुण पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. पवार यांनी सहकार्य केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. एल. सावंत यांनी आभार मानले.

**वरिष्ठ महाविद्यालय, अक्कलकुवा**

अक्कलकुवा येथील आरएफएनएस वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनातर्फे मिशन युवा स्वास्थ्य अभियानांतर्गत लसीकरण मोहीम राबविण्यात आली. प्राचार्य डॉ.सी.पी. सावंत उपस्थित होते. शिबिरात २२ जणांना लस देण्यात आली. लसीकरणासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती पटले, समुपदेशक महेश कुवर, आरोग्य सेविका अलका पाडवी यांच्या पथकाने परिश्रम घेतले. रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. विजय पाटील, रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश्वरसिंग पाडवी, डॉ. योगेश दुशिंग, डॉ. मोहम्मद जुबेर शेख, डॉ. मनोज मुधोळकर, प्रा. अंकुश खोब्रागडे, प्रा. गोटू सूर्यवंशी, प्रा. विनिश चंद्रण व अंकुश ठाकरे, दिनेश ईशी, नारायण पाटील व प्रशांत पिंपरे आदी उपस्थित होते. शिबिरासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद जोगदंड आणि विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भरत पाटील यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

# अक्कलकुवा महाविद्यालयात शहिदांना अभिवादन

- अक्कलकुवा येथील विद्या विकास मंडळाच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधान दिन व २६/११ च्या मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना अभिवादनाचा कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठी व अद्वितीय संविधान असून तिचे वाचन प्रत्येक भारतीयाने केले पाहिजे व भारतीय संविधानात दिलेल्या मूलभूत हक्कांपेक्षा भारतीय नागरिकांनी मूलभूत कर्तव्याचे पालन करावे, असे सांगितले.
- अधिसभा सदस्य जी.वाय. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.अरुण पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एल. सावंत, सहायक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.एस. पवार, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. संविधान उद्देशिकेचे वाचन डॉ. राजेंद्र काकुस्ते यांनी तर सूत्रसंचालन डॉ.अरुण पाटील यांनी केले.

Scanned with CamScanner

लोकमत

# लसीकरणाला विद्यार्थ्यांकडून उ



अक्कलकुवा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या लसीकरणप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, प्रा.एम.एल. सावंत आदी.

## अक्कलकुवा महाविद्यालयात रासेयोचा उपक्रम

- अक्कलकुवा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व प्राथमिक आरोग्य केंद्र अक्कलकुवा यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी कोरोना लसीकरण मोहीम राबविण्यात आली. प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी सर्व रासेयोच्या स्वयंसेवकांनी लसीकरण मोहिमेस सहकार्य करून सहभाग घेण्याचे आवाहन केले.
- यावेळी सिनेट सदस्य जी.वाय. पाटील, डॉ.दिनेश खरात, डॉ.महेश गांगुर्डे, डॉ.ए.व्ही. वाविस्कर, डॉ.जे.बी. वागुल, डॉ.आर.सी. बेडसे, प्रा.आर.एस. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.अरुण पाटील, डॉ.राजेंद्र काकुस्ते, प्रा.डी.डी. पाटील, प्रा.आर.सी. पाटील, प्रा.एम.जी. वसावे, प्रा.पी.एम. नाईक, मुख्याध्यापक पिंपळे, प्रा.शेख, प्रा.आगळे, प्रा.भदाणे, प्रा.पवार उपस्थित होते. प्रास्ताविक रासेयो अधिकारी प्रा.एम.एल. सावंत यांनी तर आभार महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.एस. पवार यांनी मानले.

Scanned with CamScanner

लोकमत

शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

# जिल्ह्यात मतदारदिनी युवा मतदारांनी घेतली लोकशाही बळकटीची शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** जिल्ह्यातील विविध भागात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी शासकीय स्तरावरून शाळांमध्ये विविध स्पर्धा घेत जनजागृती करण्यात आली.

**महात्मा फुले विद्यालय**

नंदुरबार शहरातील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सतीष मंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून इंदास पावरा होते. अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक मंगळे यांनी मतदार दिनाचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन महेंद्र धनगर तर आभार दिपक पावरा यांनी मानले.

**एस.ए.मिशन हायस्कूल, नंदुरबार**

नंदुरबार शहरातील एस.ए.मिशन हायस्कूलमध्ये मतदार दिनानिमित्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली. यावेळी कल्याणी पवार हिने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व पटवून दिले. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मिशन हायस्कूल च्या विद्यार्थिनींना घवघवीत यश मिळवले. विद्यार्थिनींचे जिल्हाधिकारी मनिषा खत्री, प्रांताधिकारी मीनल करनवाल, तहसिलदार भाऊसाहेब थोरात यांचा हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेत निलाक्षी मिश्रा हिने निबंध स्पर्धेत प्रथम तर रांगोळी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. निबंध स्पर्धेत नववी ते बारावीच्या गटात आर्या देवेंद्र अहिरे हिने तृतीय आणि महाविद्यालयीन गटात श्रुती पवार हिने तृतीय तसेच नववी ते बारावी गटात चित्रकला स्पर्धेत रोशनी प्रभु पवार तृतीय क्रमांक मिळवला. प्राचार्या नूतनवर्षा वळवी, उपमुख्याध्यापक व्ही.आर. पवार, पर्यवेक्षिका वंदना जांभिलसा, पर्यवेक्षक मीनलकुमार वळवी यांनी अभिनंदन केले. प्रसाद दीक्षित, पल्लवी पोळ, महिमा नाईक, चंद्रलेखा भामरे,शारदा पाटील यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

**मोलगी आश्रमशाळा**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नटवर तडवी होते. यावेळी अधीक्षक बालाजी रसाळ यांनी मतदानाचे महत्व आणि राज्यघटनेने दिलेला मतदार असल्याचा अधिकार याविषयी माहिती



नंदुरबार तहसील कार्यालयात झालेल्या स्पर्धेत यश प्राप्त करणाऱ्या एस.ए.मिशन हायस्कूलच्या विद्यार्थिनींसोबत जिल्हाधिकारी मनीषा खत्री, प्रांताधिकारी मीनल करणवाल, तहसीलदार भाऊसाहेब थोरात आदी. (छाया : लोकमत फोटो)

मतदान प्रक्रिया, निवडणूक आयोग यांची भूमिका आणि भावी मतदार याविषयी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक नटवर तडवी यांनी घटनेची वैशिष्ट्ये, मतदानाचे महत्व,निर्वाचन आयोगाची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. शिवदास वसावे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. मुख्याध्यापक दिलीप नगराळे, संजय

शिवदास वसावे, ज्योती तडवी, निशा वळवी, उदय गावीत, लोटन पावरा, अनिल गावित, बालाजी रसाळ, दीपाली पाटील, प्रभात देसले, यशवंत वळवी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवदास वसावे यांनी तर आभार ज्योती तडवी यांनी मानले.

**ठाणेपाडा ता. नंदुरबार**

तालुक्यातील ठाणेपाडा येथील कृष्णराव दामजी गावित प्राथमिक,

विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यात पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या हस्ताक्षरात 'संकल्प माझा-लोकशाही बळकटीचा' या उपक्रमांतर्गत पत्राचा नमुना लिहून शाळेत जमा केला. विद्यार्थ्यांनी 'संकल्प माझा-लोकशाही बळकटीचा' याची शपथ घेतली. प्राचार्य बी. डी. पाटील यांनी प्रसंगी

## अक्कलकुवा महाविद्यालयात विविध उपक्रम

नंदुरबार : अक्कलकुवा येथील विद्याविकास कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिन-लोकशाहीचा जागर या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रसंगी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.

मतदार दिनानिमित्त तहसील कार्यालय व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी व निबंध स्पर्धा घेण्यात आली. प्रास्ताविक विद्यार्थी विकासप्रमुख डॉ. अरुण पाटील यांनी केले. यावेळी घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत दिशा विनोद बनिया, जुही विनोद बनिया यांनी प्रथम, ज्योती बनेचंद जैन, श्रुती राजेश जैन द्वितीय, प्रांजल किरण डेपले तृतीय, रंजना गुलाबसिंग पाडवी, अनिषा पोहल्या वसावे, राजनंदनी फतेसिंग पाडवी, आरती वसावे यांनी तर निबंध स्पर्धेत प्रांजल डेपले प्रथम, ज्योती जैन द्वितीय, श्रुती जैन तृतीय तर जुही आणि दिशा बनिया यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

सूत्रसंचालन प्रा. एम. एल. सावंत यांनी तर आभार प्रा. एस. एस. पवार यांनी मानले. सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

यानिमित्ताने विद्यार्थी आणि त्यांची कुटुंबे राष्ट्रीय मतदार दिनाच्या प्रवाहाशी जोडली जाणार आहेत. हा एक अभिनव राष्ट्रीय उपक्रम असून राष्ट्र कल्याणासाठी अतिशय महत्वाचा आहे. वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या सर्वांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याचा आग्रह करावा, असे सांगितले. कार्यक्रमास शिक्षक व

सूत्रसंचालन के. डी. पाटील यांनी तर आभार बी. वाय. पाटील यांनी मानले. जी. के. पवार, एन. एस. पाटील, आर. पी. शहा, एस. एन. निकम, एस. आर. माळी, बी. वाय. पाटील, के. डी. पाटील, व्ही. यू. घुगे, आर. एस. सूर्यवंशी, जी. वाय. सोनवणे, मनोज शेवाले, डी. बी. पाटील, सचिन कोळी, एफ. ओ. सावळे, अमृत पाटील

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

लोकमत

# अक्कलकुवा महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा** : विद्या विकास मंडळाच्या येथील वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराला २२ फेब्रुवारीपासून जामली (नर्सरी), ता. अक्कलकुवा येथे सुरुवात होत आहे. सातदिवसीय या शिबिरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे व्याख्यान व गावविकासाचे उपक्रम राबविले जाणार आहेत.

शिबिराचे उद्घाटन २२ फेब्रुवारी रोजी माजी सैनिक प्रताप वसावे यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रजित पाटील, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. पी. सावंत, सरपंच विमलाबाई वसावे, उपसरपंच राजेंद्र पाडवी, प्राचार्य एस. बी. पाटील, प्रा. आर. एम. पाटील, सिनेट सदस्य जी. वाय. पाटील, डॉ. सचिन नांद्रे, डॉ. विजय पाटील, डॉ. दिनेश खरात, अनिता वळवी, बी. आर. मोरे, रत्नाकर शेंडे, दारासिंग वळवी, नथ्थू वळवी, दक्षणा वळवी उपस्थित राहतील. सात दिवसात विविध तज्ज्ञांचे व्याख्यान होणार आहे. त्यात डॉ. महेश कुंवर, दारासिंग वळवी, डॉ. एस. बी. पाटील, डॉ. ए. व्ही. बाविस्कर, रामसिंग बागूल, सुनील देडे, प्रा. डॉ. विजय पाटील, प्रा. पी. आर. पाटील, मनोज शेलार यांचा समावेश आहे. शिबिरादरम्यान स्वच्छ भारत अभियान, पाणी व्यवस्थापन, आरोग्य सर्वेक्षण, पर्यावरण संवर्धन, वॉर्ड विस्तार, कोरोनामुक्त गाव जागृती आदी उपक्रम राबविले जाणार आहेत.

समारोप २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होईल. अध्यक्षस्थानी खासदार डॉ. सुभाष भामरे असतील, अशी माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. एल. सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. पवार यांनी दिली.

Hello Nandurbar
Page No. 2 Feb 19, 2022
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

11:49 am 49%

लोकमत

# जामली येथे रंगले श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा** : येथील कला, वाणिज्य महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जामली, ता.अक्कलकुवा येथे राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील तर उद्घाटक म्हणून माजी सैनिक प्रताप वसावे उपस्थित होते. या वेळी सिनेट सदस्य डॉ.दिनेश खरात, रासेयो नंदुरबार जिल्हा समन्वयक डॉ. विजय पाटील, सरपंच विमलबाई वसावे, उपसरपंच राजेंद्र पाडवी, काशिनाथ वळवी उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.सी.पी. सावंत यांनी सांगितले की, सात दिवसीय शिबिरातून भविष्यासाठी अनुभवाची एक शिदोरी घेऊन तुम्हाला भावी जीवनासाठी फार उ पडेल. डॉ.विजय पाटील, सिनेट डॉ.दिनेश खरात यांनीही शिबि मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्रा.आर.एस. प विद्यार्थी कल्याण विभाग डॉ.अरुण पाटील, डॉ.महेश डॉ.आर.सी. बेडसे, डॉ.आर.जी. क डॉ.ए.व्ही. बाविस्कर, प्रा.आर.सी. प प्रा.डॉ.जितेंद्र बागुल, प्रा.पी.एन. आदींनी सहकार्य केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी. यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसं कार्यक्रम अधिकारी रासेयो प्रा.ए सावंत तर आभार महिला का अधिकारी प्रा.एस.एस. पवार मानले.

Hello Nandurbar
Page No. 2 Feb 27, 2022
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

लोकमत

# हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा जामली येथे समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा** : कला, वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप जामली, ता. अक्कलकुवा येथे झाला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील तर समारोपकर्ते म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे सिनेट सदस्य जी. वाय. पाटील उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते याहा मोगीमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जी. वाय. पाटील यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्या या सात दिवसात आलेले अनुभव भावी जीवनात नक्कीच उपयोगी पडतील. परंतु तुम्ही सर्वांनी समाजसेवा करण्याचे ध्येय ठेवा. प्रत्येकाने एक झाड जरी लावले तरी पर्यावरणाला आपला हातभार लागेल असे मी समजेन. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनीही शिबिर काळात आलेले अनुभव कथन केले. याप्रसंगी सरपंच विमलाबाई वसावे, उपसरपंच राजेंद्र पाडवी, प्रा. आर. एस. पाटील, डॉ. महेश गांगुर्डे, डॉ. आर. सी. बेडसे, डॉ. ए. व्ही. बाविस्कर, प्रा. डी. डी. पाटील, प्रा. आर. सी. पाटील, प्रा. एम. जी. वसावे, प्रा. पी. एन. नाईक, प्रा. वर्षा राहसे उपस्थित होते. शिबिराचा अहवाल वाचन प्रा. उमेश सैंदाणे यांनी केला. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. एल. सावंत यांनी केले तर आभार एस. एस. पवार यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व जामली ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

# विविमचे कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा.

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल वर्ष 2021-22

### अक्कलकुवा कॉलेजचे उद्घाटन सोहळा जामली

रा .से .यो . शिबिराचा अहवाल वाचन करतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व कला आणि वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा यांच्या सयुक्त विद्यामाने राष्ट्रीय सेवा योजनाच्या मार्फत दत्तक गाव जामली ता. अक्कलकुवा जिल्हा नंदुरबार येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर दिनांक २२/०२/२०२२ ते २८/०२/२०२२ या कालावधीत पार पडत आहे.

दिनांक २२/०२/२०२२ रोजी शिबिराचे उद्घाटन ११:०० वाजता जामली येथे झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. पाटिल सर होते तर उद्घाटन माझी सैनिक मा. प्रतापराव वसावे व प्राचार्य डॉ. सी.पी. सावंत सर उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. दिनेश खंरात, रासेयो नंदुरबार जिल्हा समन्वय डॉ.विजय पाटील, सरपंच विमलाबाई रोहिदास वसावे, उपसरपंच राजेंद्र जयवंत पाडवी व काशिनाथ दादा वळवी उपस्थित होते.

शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ.सी.पी. सावंत सरांनी सांगितले की आपण या सात दिवशीय शिबिरातून भविष्यासाठी विविध अनुभवाची एक शिदोरी घेऊन जा.. ती तुम्हाला भावी जीवनासाठी फार उपयोगी पडेल. तसेच प्रमुख पाहुणे डॉ. विजय पाटील रासेयोच्या स्वयंसेवकांना एक संदेश दिला. की मित्रानो दोस्ती आकाशाशी व मस्ती मातीशी असली पाहिजे. हे सांगत असतांना विविध कामे व जबाबदार्यांची आठवण करून दिली. Not me but you मी माझ्यासाठी नाही तर समाजासाठी आहे. तसेच अद्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील सरांनी बोलतांना एक गोष्ट आवर्जून सांगितली की, या सात दिवसात तुमच्यातले दुर्गण आळशीपणा व्यसनाधीनता याच्यातून तुम्ही मुक्त होणार हे शिबीर म्हणजे एक बगीचा आहे, बागीचातील फुले, झाडे यांना छाटून माळी कसा आकार देतो. त्यापद्धतीने येथे तुम्हाला घडविले जाईल.सिनेट सदस्य डॉ. दिनेश खरात यांनी तर मी रा.से.यो. मधून घडलो आहे.म्हणून असे अनेक शिबिरे विविध स्थरावर केली आहे. तुम्हाला हि एक संधी आहे.या संधीच सोने करा.उद्घाटन सोहळा प्रसंगी प्रा.आर.एस. पाटील, विद्यार्थी कल्याण विभाग प्रमुख डॉ.अरुण पाटील, डॉ. महेश गांगुर्डे, डॉ. आर. सी. बेडसे, डॉ. आर.जी. काकुस्ते, डॉ.ये.व्ही. बाविष्कर, प्रा.आर.सी. पाटील, प्रा.डॉ. जितेंद्र बागुल, प्रा. पी.एन. नाईक, डॉ. जोगदंड सर, डॉ. मुथोळकर, डॉ.खोब्रागडे, प्रा.पाडवी सर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्याकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी. वसावे तर सूत्रसंचालन कार्यक्रम अथिती (रासेयो) प्रा.एम.एल.सावंत यांनी व आभार महिला कार्यक्रम अधिकार प्रा.सौ.एस.एस.पवार मडम यांनी मानले व विशेष परिश्रम घेणारे प्रा. सैंदाणे सर हे ७ दिवसीय शिबिरात उपस्थित राहणार आहे.

**1.**दिनांक:- २२/०२/२०२२ रोजी उद्घाटन झाल्यानंतर १० - १० स्वयंसेवकाचे ग्रुप पाडण्यात आले.ह्यात त्यातील एका सदस्याला ग्रुप लीडर केले व सर्वांनी एकमेकांचा परिचय केला. तसेच गीतमंच कार्यक्रम घेऊन विद्यापीठ गीत व NSS गीतांसह इतर गीत सराव तोंडपाठ करून घेतली. रात्री भोजना नंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. रात्री १० वाजता प्रार्थना व दिपमालवन झाले.

Scanned with CamScanner

**2.**दिनांक:- २३/०२/२०२२ रोजी सकाळी योगासन व व्यायाम प्रा. एम.एल. सावंत यांनी स्वयंसेवकांना शिकविले व्यायाम झाल्यानंतर प्रार्थना करून व नास्ता केला. त्याच्या नंतर प्रेमविवाह योग्य की अयोग्य या दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी गट चर्चा केली. त्यात अविनाश बसावे, जगदीश पाटील, आयुषी राणा, रंजना, सागर, ज्ञानेश्वर यांनी आपआपली मते मांडली.तसेच सकाळी १० वाजेनंतर २३ फेब्रुवारी संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित स्वच्छता अभियान जामली गावात राबिवण्यात आले.

दुपारच्या सत्रात वैचारिक प्रबोधनात ३ ते ४ या वेळेत मा.महेश कुवर यांनी सिकलसेल या आजारावर विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली व शंका कुसंकाचे निरसन केले नंतर ४ ते ५ या वेळेत मा. श्री दारासिंग दादा वळवी यांनी शून्यातून विश्व निर्माण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विविध उदाहरणासह त्यांना प्रभावित केले. रात्री भोजना नंतर स्वयंसेवकांनी माझे गाव कोरोनामुक्त गाव या विषयावर पथनाट्य सांस्कृतिक कार्यक्रमात सादर केले. रात्री १० वाजता झोपले.(विद्यापीठाचे NSS संचालक डॉ. सचिन नांद्रे )

**3.**दिनांक:- २४/०२/२०२२ रोजी सकाळी व्यायम, योगासानानंतर, प्रार्थना व नास्ता केल्यानंतर अंधश्रद्धा या विषयावर गटचर्चा केली. त्यात सर्व स्वयंसेवकांनी उत्सुफुर्तपणे सहभाग घेतला. गट चर्चे मध्ये विविध मुलांनी मांडलेल्या मतांच्या आधारे गटचर्चा समारोप प्रा. एम.एल. सावंत यांनी केले.१०:३० नंतर गावात हागणदारी मुक्त गाव हे पथनाट्य प्रत्येक गल्लीत सादर केले. दुपारच्या सत्रात ३ ते ४ वा. या दरम्यान डॉ. ये. व्ही. बाविस्कर यांनी शिक्षण हक्क कायदा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच दुपारी ४ ते ५ या वेळेत प्रा. यु.डी. सैंदाणे स्पर्धा परीक्षा संदर्बात मार्गदर्शन केले. ५ ते६ या वेळेत स्वयंसेवकांनी फन्नी गेम खेळून रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात हागणदारी मुक्त गाव या विषयावर पथनाट्य सादर करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

**4.** दिनांक:-२५/०२/२०२२ रोजी सकाळी व्यायम, योगासना नंतर गीत मंच कार्यक्रमात विद्यापीठ गीत,NSS गीत, हम होंगे कामयाब, सर्व धर्मीय प्रार्थना असे विविध गीतांचा कार्यक्रम झाला. त्याच्या नंतर कोरोना व लॉकडाऊन चा परिणाम या गट चर्चेच्या विषयात सागर,जगदीश,आयुषी,प्रांजळ,तिशा,जुही,रवींद्र,अविनाश इ.विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सकाळी १० नंतर जामली गावातील ग्रामस्थांना स्वयंसेवकांनी भ्रस्टाचार हे पथनाट्य प्रत्येक गल्लीत जाऊन आपली कला प्रस्तुत करून जनजागृती केली.दुपारी ३ ते ४:५० वा. या वेळेत मा.सुनील देडे (अधीक्षक आश्रमशाळा कुंभार खान ) यांनी सोसीअल मेडिया चा समाजावर होणारा परिणाम या विषयावर विविध खेळांच्या सहायाने स्वयंसेवकांचे फारच मनोरंजन केले.

**5.** दिनांक:-२६/०२/२०२२ रोजी सकाळीनेहमी प्रमाणेव्यायाम,योगासन करून चाय नास्ता नंतरस्वयंसेवकांनी दिलेल्या बालविवाह या विषयावर हिरीहीरीने भाग घेतला व बालविवाहाचे दुष्परीणाम सांगितले तसेच सकाळी ११ वाजता जिजामाता महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे प्रा.डा रत्नपारखे सर व जी.एन.पाटील सर यांनी स्वयंसेवकांशी शिबीराबाबत हितगुज केली.तसेच १२ वाजता कराटे प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेण्यात आला त्यात कराटेपटू वर्ष राहसेयांनी मुलींना कराटेचे विविध प्रकार शिकविले त्याला उत्कृष्ठ प्रतिसाद मिळाला. दुपारच्या सत्रात ३ ते ५ या यं वेळेत सेंद्रिय शेती या विषयावर प्रा. डॉ. विजय पाटील राष्ट्रीय सेव योजनाचे नंदुरबारचे जिल्हा समन्वयक यांनी सेंद्रिय शेतीची संकल्पना स्पष्ट केली . शेतीत कोणते खत व टेकनिक वापरावे या बाबत अनेक प्रश्न स्वयंसेकांनीविचारले .व सरांनी

Scanned with CamScanner

त्यांच्या शंकांचे निरसन केले .तसेच प्रा.डी .डी .पाटील ,प्रा .डा .अरुण पाटील ,प्रा .आर .एम .पाटील ,प्रा .पाडवी सर ,राजू संधदान,सुरेश नाईक इत्यादिंनी शिबिराला भेटी दिल्या .रात्रीच्या सांस्कृतीकचे कार्यक्रमात विधार्थ्यांनी नेहमी प्रमाणे बोलीभाषेतील रोडली सादर केली .

6. दिनांक:-२७ /०२ /२०२२ रोजीनेहमी प्रमाणे भ्रष्टाचार या विषयावर रवींद्र राऊत ,उमेश पाडवी यांनी मनोगत व्यक्त केली .तसेच ,प्रा .डी .डी .कोकणी यांनी पण मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.रंजना पाडवी हिने केले.तर आभार कु.जुही बनियाने मानले.यानंतर ११ ते १२ या वेळेत वर्षा राहसे यांनी दुसऱ्या दिवशीही कराटेचे प्रशिक्षिन दिले .दुपारी १२ ते १ या दरम्यान स्व यं सेवकांनी जामली गावाचा सामाजिक ,आर्थिक ,व आरोग्य विषयक लसीकारण बाबतचा सर्वे केला .दुपारच्या सत्रात प्राचार्य डा एस.बी.पाटील सरांनी पाण्याचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले.तसेच प्रा एम एल सावंत यांनी जागतिक तापमान व ओझोन क्षयाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले.यानंतर ४ ते ५ या वेळेत प्रा सौ एस एस पवार यांनी सामाजिक पर्यावरण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.रात्री १० वाजे पर्यंत विविध बोलीभाषेतील पथनाट्य सादर केलीत शेवटी येणाऱ्या होळी उत्सवाची रंगीत तालीम केली.रात्री १० वाजता द्वीपमालवण झाले.

7. दिनांक:-२८ /०२ /२०२२ रोजीसंध्याकाळी ४ वाजता शिबिर समारोपास सुरवात झाली.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डा एस बी पाटील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तर समारोपकर्ते क ब चौ उ म वि जळगावचे सिनेट सदस्य मा श्री जी वाय पाटील उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने व आदिवासींचे कुलदैवत याहा गीमाताप्रतिमेचेपूजनानेझाली. श्री जी वाय पाटील यांनी स्वयंसेवकांना उद्देशून सांगितले कि ,तुम्हाला या ७ दिवसात आलेले अनुभव आपल्याला भावी जीवनात नक्कीच उपयोगी पडतील . परंतू तुम्ही सर्वांनी सामाज सेवा करण्याचे ध्येय ठेवा. प्रत्येकाने किमान एक झाड जरी लावले तरी पर्यावरणाला आपला हातभार लागेल. असे मी समजेल. तसेच तुम्ही सर्वांनी या गावाचा सर्वेक्षण केले ते आपल्याला भविष्यात संशोधनासाठी उपयोग होईल तसेच अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डा एस बी पाटील यांनी शिबिरार्थींचे मनोगत एकून त्यांना मोलाचा सल्ला दिला व म्हणाले कि ,या ठिकाणी बऱ्याच मुलींनी स्वंपाकाची कला शिकून घेतली हि कला व आलेला अनुभव इतरांना सांगा तसेच पाण्याचे व्यव स्थापन करा,आपले आरोग्य सांभाळा,अभ्यास करा,उच्च पदावर जाण्याचे ध्येय ठेवा.भविष्यात तुम्हाला आमच्या विविध जागीच्या खुर्चीवर विराजमान होता येईल.शिबिरातून आलेला अनुभव स्वयंसेवकांनी मनोगतातून व्यक्त केला.त्यात कु प्रांजळ ढेपले ,सागर वळवी ,रवींद्र राऊत ,कु पाडवी रंजना ,उज्ज्वल सैदाणे ,कु टीशा बनिया ,पाडवी अविनाश ,कु राणा आयुषी ,इत्यादींनी आलेले अनुभव व्यक्त केली.प्रमुख पाहुणे म्हणून जामली गावाचे सरपंच मा.विमलाबाई रोहिदास वसावे ,उपसरपंच मा.राजेंद्र जसवंत पाडवी ,प्रा.आर एस पाटील ,डा महेश गांगुर्डे ,डा आर सी बेडसे ,डा ए व्ही बाविस्कर,प्रा डी डी पाटील,प्रा आर सी पाटील,प्रा एम जी वसावे,प्रा पी एन नाईक,प्रा डी डी कोकणी,प्रा वसावे सर, वर्षा राहसे,इत्यादी उपस्थित होते.शिबिराचे अहवाल वाचन प्रा उमेश सैदाणे सर यांनी व कार्यक्रमाचे सूत्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा एम एल सावंत तर आभार प्रा सौ एस एस पवार यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राध्यापक,प्रध्यापकेत्तर कर्मचारी,जामली गावाचे ग्रामस्थ तसेच योगेश सोनवणे,राजू संधान व सुरेश नाईक यांनी परिश्रम घेतले.

N.S.S. Programme Officer
V.V.M.'s Arts & Commerce College
Akkalkuwa Dist.Nandurbar.

PRINCIPAL
Vidya Vikas Mandal's,
Arts & Commerce College
Akkalkuwa Dist. Nandurbar

Scanned with CamScanner

विद्या विकास मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा जि. नंदुरबार

## वर्ष २०२१-२०२२

## नियमित कार्यक्रम अहवाल

दिनांक २१/०६/२०२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने योगा चे धडे घेण्यात आले, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रा.आर.सी.बेडसे सर, (क्रीडा संचालक) व सहाय्यक प्राध्यापक डॉ.महेश गांगुर्डे सर यांनी सर्वांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले व सर्वांनी ते केलेत. योगाचे प्राणायाम, अनुलोम-विलोम, उभे व बैठे आसन, पोटावरचे आणि पाठीवरचे आसने केलीत योगा केल्याने होणारे विविध फायदे आणि योग्य पद्धतीने ते केल्यास त्याचा आरोग्यास कसा फायदा होतो हे सांगितले.

दिनांक ०१/०७/२०२१ हा दिवस महाराष्ट्रशासनाने ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम करण्यासाठी निश्चित केला त्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालय, शाळाआणि सरकारी कार्यालये सर्वांना शासनाने सक्तीने वृक्ष लागवड करणे ठरवून दिले आम्ही या दिवशी आमच्या टार्गेट एवढी ५० रोपे लावलीत यात, मोह, खिरणी, आंबा, साग, निम, चिंच अशीरोपे लावली या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्व रोपे आम्हाला गंगापूर नर्सरी तून मोफत मिळाली पूर्वीच्या आठवडयात आम्ही रोपे लावण्यासाठी गड्डे करून घेतले आणि सर्व महाविद्यालय व एन.एस.एस. विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास पुर्णत्वाकडे

Scanned with CamScanner

नेले.सदर कार्यक्रमाचा अहवाल विद्यापीठ व सहसंचालक कार्यालय जळगाव यांच्याकडे सादर केला.

दिनांक ११/०७/२०२१ह्या दिवशी"**तंबाखूमुक्त जीवन**"(pledge for life)कार्यक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना टाटा कॅन्सर हॉस्पिटल मुंबई येथील डॉक्टरांनी तयार केलेक्या व्हिडीओ क्लिप्स दाखवण्यात आल्या. व्हिडीओ क्लिप्सच्या माध्यमातून तंबाखू, सिगारेट व तंबाखूयुक्त पदार्थांमुळे होणारे दुष्परीणाम, विविध आजार जसे तोंडाचा कॅन्सर, घाश्याचा कॅन्सर, फेफड्याचा कर्करोग व इतर आजार यांच्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.तंबाखूयुक्तउत्पादनांच्या सेवनामुळे मनुष्याच्या कोणकोणत्या शारीरिक व मानसिक आजारांची लागण होते व त्या आजारांचा शेवट हा मृत्यू आहे. आजारातून बरे होण्याचे प्रमाण हे अत्यल्प आहे म्हणून तंबाखूयुक्त पदार्थांच्या सेवनापासून लांब राहणे गरजेचे आहे. कार्यक्रमात वेगवेगळ्या कर्करोग ग्रस्त रुग्णांच्या मुलाखती व्हिडीओ क्लिप्सद्वारे दाखवण्यात आल्या. कर्करोगासाठी असणाऱ्या विविध उपचार पद्धतींची माहिती दाखवण्यात आली. कर्करोग रुग्णांच्या मुलाखातीतूनव्यसनांपासून दूर राहिले पाहिजे असा निष्कर्ष विद्यार्थ्यांनी काढला. कार्यक्रमास उपस्थीतांनी **तम्बाखुमुक्तीची शपथ** घेतली व आयुष्यभर कुठल्याही प्रकारचे व्यसन करणार नाही व सभोवताली कोणालाही व्यसन करू देणार नाही असा निश्चय केला. सर्व महाविद्यालय व एन.एस.एस. विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास पुर्णत्वाकडे नेले.

"**स्वच्छता अभियान पंधरवाडा**"दि. १/०८/२०२१ ते १५/०८/२०२१ दरम्यान कृती कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. दि. १ ऑगस्ट

Scanned with CamScanner

२०२१ रोजी महाविद्यालयात स्वच्छतेवर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.आर.एस. . पाटील सर होते.त्यांनी विद्यार्थ्यांना "स्वच्छ भरत अभियान" या विषयावर मार्गदर्शन केले. शारीरिक स्वच्छता,परिसर स्वच्छता या शतकातील महत्वपूर्ण गरज आहे व आपल्या जीवनातील विभिन्न अंग आहे असे नमूद केले. स्वछता न राखल्यामुळे होणाऱ्या गंभीर आजारांना आपल्याला सामोरे जावे लागते व त्याचे परिणाम देशातील सर्वच घटकांवर होतात म्हणून प्रगत देशातील व्यक्ती हि स्वच्छतेप्रती समर्पित असते. स्वच्छता अभियानात रा.से. यो. स्वयंसेवक व देशातील युवाकांचे कार्य महत्वपूर्ण आहे व स्वछातेसोबत पर्यावरणाचा समतोल राखण्यास आपण सर्वांनी पुढे यावे असे आव्हान देखील केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील सर यांनीअध्यक्षीय मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रमात विध्यार्थी, विद्यार्थिनीव प्राध्यापक वृंद उपस्थितहोते. सर्व उपस्थितांनी **"स्वच्छता शपथ"** घेतली.

दि. २ ऑगस्ट २०२१ तेदि. ५ ऑगस्ट २०२१ रोजीपर्यंत रा. से. यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता केली. यात प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष वर्गाच्या खोल्यांची स्वच्छता करण्यात आली. व भूगोल या प्रयोगशाळाचीस्वच्छता, ग्रंथालय, सेमिनारहॉल, स्टाफ रूम, लेडीज रूम, प्राचार्य कक्ष, महाविद्यालयाचे मैदान,याप्रमाणे संपूर्ण महाविद्यालयाची स्वच्छता केली.**दि. ०६ ऑगस्ट २०२१ तेदि. ०८ ऑगस्ट** २०२१ दरम्यान रा. से. यो, दत्तक गाव जामली नर्सरी,ता. अक्कलकुवा येथे विद्यार्थ्यांनी गावातील लोकांना घरोघरी जावून स्वच्छतेचे महत्त्व पटवून

Scanned with CamScanner

दिले व शौच्छालयाचावापर करणे किती महत्वाचे आहे याविषयी जनजागृती केली. परिसरस्वच्छतेचा संदेशही देण्यात आला. दि. ०९ ऑगस्ट २०२१ तेदि. १० ऑगस्ट २०२१ या कालावधीत जामली नर्सरी येथे विद्यार्थ्यांनी गावातील साफसफाई, रस्त्यांची स्वच्छता, शाळा व मंदिर परिसरातील गावात काढून स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला.

दि.०९आगस्ट २०२१ रोजी क्रांतीदिन ,जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यातआला.तसेच १३ आगस्ट २०२१ रोजी अवयवदान दिवस निमित्ताने महाविद्यालय मैदानात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली स्वयंसेवकांची मिटिंग घेतली व महाविद्यालयाला “स्वच्छ महाविद्यालय” (Clean Institute ) घोषित केले. सदर मिटिंग दरम्यान भविष्यात कश्या प्रकारे आपण महाविद्यालय व परिसर श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छ ठेऊ शकतो याबद्दल चर्चा केली. चर्चेअंती स्वयंसेवकांनी दर पंधरवड्याला महाविद्यालय व परिसर श्रमदानाने स्वच्छ ठेवण्याचा निर्णय घेतला. सदर मिटिंग मध्ये स्वयंसेवकांनीभविष्यात पाणी व्यवस्थापन, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता अश्या विषयांवरनाविन्यपूर्ण काम करू असा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

दिनांक ०७/०९/२०२१ रोजी रा. से. यो. विभाग व आय. सी. टी. सी. अक्कलकुवा यांच्या संयुक्त विद्यामाने महाविद्यालयात **"रेड रीबन क्लब उद्धाटन व व्याख्यान"** घेण्यात आले. रा. से. यो. स्वयंसेवकांन मधून २०० रा. से. यो.स्वयंसेवकांचा रेड रीबन क्लब स्थापन करण्यात आला. त्यातील १५स्वयंसेवकांची कार्यकारणी तयार करून वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमाचे

Scanned with CamScanner

जबाबदाऱ्या देण्यात आल्या. उद्घाटन प्रसंगी श्री महेश कुवर, समुपदेशक (आय. सी. टी. सी. अक्कलकुवा )यांनी रक्तगट तपासणी चे महत्व, HIV-AIDS बाबत जनजागृती किती महत्वाची आहे हे सांगितले. रक्दानाचे महत्व बाबत मार्गदर्शन केले.प्राचार्यएस. बी.पाटील यांनी रक्तदान श्रेष्ठ दान याविषयी मार्गदर्शन केले.

दिनांक २४/०९/२०२१ रोजी महाविद्यालयात **"रासेयोवर्धापनदिवस"** साजरा करण्यात आला. दिनांक२४सप्टेंबर२०२१रोजीरासेयोविभागातर्फे "रासेयोवर्धापनदिवसवराष्ट्रपितामहात्मागांधीजयंतीसप्ताहाचे" उद्घाटनप्राचार्यएस. बीपाटील.सरयांच्याहस्तेकरण्यातआले.

दिनांक ०२ **ओक्टोबर२०२१ रोजी** महात्मा गांधीयांचीजयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी व कर्मचाऱ्यांनी Fit India plogging Run मध्ये सहभाग नोंदवून १ किलोमीटर पर्यंत चे अंतर धावत जावून पार केले नंतर सर्वांनी महात्मा गांधी यांची प्रतिमा पूजन करून राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.

दिनांक २७ **आक्टोमबर** २०२१ रोजी मिशन युवा स्वास्थ्य **दि.२७ आक्टोबर २०२१ते २ नोहेंबर २०२१** या कालावधीत महाविद्यालयीन विद्याथ्यासाठी **कोविड १९ लसीकरण मोहीम** उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वेय राबिण्यात आला.

दिनांक ३१ ओक्टोबर२०२१ रोजीविद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म दिवस हा 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटन मा.

Scanned with CamScanner

प्राचार्य डॉ.एसबी.पाटील सर याच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ एस.बी.पाटील सरयांनी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या कार्याचा उजाळा करून देत सांगितले की,भारतास एकसंघ ठेवण्यासाठी त्यांनी ५६२ संस्थानिकांचे विलीनीकरण घडवून आणले. अश्या निस्वार्थी व प्रेरणादायी व्यक्तीचा सर्वांनी आदर्श घ्यावा व आपल्या युवा पिढीने बहुभाषिक राष्ट्राला एकसंघ ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे असे आव्हानही केले. प्रा.एम. एल. सावंत सरांनी 'राष्ट्रीय एकता दिवस शपथ' विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.ए. यु. पाटील सर यांनी केले तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थितहोते.

दिनांक २६ नोहेंबर २०२१ रोजी संविधान दिवस व शहिदांना श्रद्धांजलीचा कार्यक्रम घेण्यात आला.

दिनांक ०६ डिसेंबर २०२१ महापरीनिर्वान दिवस साजरा करण्यात आला.तसेच दिनांक ०९ डिसेंबर २०२१ रोजी महेश कुवर समुपदेशक आय.सी.टी. सी. अक्कलकुवा यांनी H.I.V.वर मार्गदर्शन केले.

दिनांक ०३ जानेवारी २०२२ रोजी"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती" राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीसाजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उदघाटन मा. प्राचार्य डॉ.एस. बीपाटील सर याच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य एस.बी.पाटील सर यांनीक्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याची दाखल घेऊन विद्यार्थ्यांना सांगितले कि

Scanned with CamScanner

अश्या प्रेरणादायी व्यक्तींचे आदर्श डोळयासमोर ठेवून यशस्वी जीवनाकडे संघर्ष करून वाटचाल करा.

दिनांक ०७/०१/२०२२ रोजी१५ ते 18 वयोगाटातील लसीकरण मोहीम राबविण्यात आला.

**दिनांक** २१जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय मतदारदिवस म्हणून निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक ढेपले प्रांजळ किरण,द्वितीय क्रमांक जैन श्रुती राजेश व जैन जयती बनेचंद,तृतीय क्रमांक बनिया टीशा विनोद व बनिया जुही विनोद विजेते ठरले. तर रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक बनिया टीशा विनोद व बनिया जुही विनोद, द्वितीय क्रमांक ढेपले प्रांजळ किरण व जैन जयती बनेचंद, तृतीय क्रमांक पाडवी रंजना,वसावे आमिषा,पाडवी राजनंदनी, वसावे आरती हे विजेते ठरले.

दिनांक १९/०२/२०२२ रोजीराष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात **"छत्रपती शिवाजी महाराज जयंती "** साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उदघाटन मा. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील सर याच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. एस. बी. पाटील सर यांनीछत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य निर्मितीच्याकार्याचेऐतिहासिक उदाहरणे देत विद्यार्थ्यांना सांगितले कि अश्या प्रेरणादायी व्यक्तींचे आदर्श डोळयासमोर ठेवून यशस्वी जीवनाकडे संघर्ष करून वाटचाल करा.

दिनांक ०८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक म. मनोजजी शेलार साहेब होते.

N.S.S. Programme Officer
V.V.M.'s Arts & Commerce College
Akkalkuwa Dist.Nandurbar.

PRINCIPAL
Vidya Vikas Mandal's,
Arts & Commerce College
Akkalkuwa Dist. Nandurbar

Scanned with CamScanner